'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF ) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Vol. 3, Issue-4
ISSN : 2348-7143
Oct-Nov-Dec 2017

# मराठीतील पहिले प्रवास वर्णन : 'माझा प्रवास'

**प्रा.डॉ. मीनाक्षी पाटील**
**लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालय,**
**पंचवटी–३**
**मोबाईल–९४२२०३१४०१**

१८५७ च्या स्वातंत्र्यलढ्याला १५० वर्षे पूर्ण झाली आहेत. या स्वातंत्र्यलढ्याचे वर्णन करणारे 'माझा प्रवास' या गोडसे भटजींच्या पुस्तकाला २००७ मध्ये १०० वर्षे पूर्ण झाली आहेत. १९०७ मध्ये प्रकाशित झालेले हे प्रवासवर्णन मराठीतील पहिले प्रवासवर्णन ठरले. गोडसे भटजी प्रवासात १८५७ च्या बंडात सापडतात त्याची हकिकत त्यांनी या पुस्तकात दिली आहे. स्वाभाविकपणे त्या हकिकतीध्ये इतिहास येतो. या पुस्तकाची मूळप्रत मोडी लिपीमध्ये लिहिलेली आहे. विष्णुशास्त्री गोडसे भटजी यांनी केलेल्या प्रवासाचे हे वृत्त. ते उत्तर हिंदुस्थानात द्रव्य मिळविण्यासाठी म्हणून गेले आणि १८५७ च्या शिपायांनी केलेल्या बंडात सापडले. आल्यावर प्रवासाची कथा सांगत राहिले. १३४ पानांच्या या पुस्तकात जवळजवळ ६० पृष्ठे इतिहासाने व्यापली आहेत, तर १० पृष्ठे ही प्रवास करत असताना ऐतिहासिक गोष्टी सांगण्यात खर्च झाली आहेत. म्हणजे जवळजवळ निम्मे पुस्तक इतिहासाने व्यापलेले आहे. पण मराठीतील ते पहिले प्रवासवर्णन असल्याने त्याचा अनेक अंगांनी अभ्यास केला आहे.

'माझा प्रवास' अथवा '१८५७ च्या बंडाची हकिकत' हे १८५७ नंतर पंचवीस वर्षांनी लिहिले गेलेले पुस्तक एकंदर मराठी प्रसाव. वर्णनात्मक पुस्तकांत अनेक दृष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण आहे. पुस्तकरूपाने चिंतामणराव वैद्यांनी संपादून हे प्रवासवर्णन १९०७ साली प्रसिध्द केले असले तरी त्याचा लेखनकाल मात्र १९८२–८३ चा आहे. हे पुस्तक प्रवासवर्णनात्मक आणि आत्मचरित्रात्मक असे दुहेरी आहे. हे पुस्तक प्रसिध्द करत असताना चिंतामणराव वैद्यांनी त्याच्यावर भाषिकदृष्ट्या मोठ्या प्रमाणात संस्कार केलेले दिसतात. भाषाशैलीच्या दृष्टीने पाहिले तर या पुस्तकाची भाषा जुन्या वळणाची कित्येक वेळेला बखरसदृश्य वाटावी अशीच आहे. विष्णुशास्त्रांचा निबंधमालेचा त्यांच्या लेखनपध्दतीवर जवळजवळ काहीच परिणाम नाही तरीदेखील मराठीतले पहिले लालित्यपूर्ण प्रवास लेखन ठरावे इतके ते नाट्यपूर्ण व वैचिन्यपूर्ण घटनांनी भरलेले आहे.

**समाजिक अंगाने अभ्यास–**

गोडसे भटजी स्वत:च्या प्रवासाची हकिकत सांगतात. ठाण्याजवळ वरसई गावचा हा गरीब भिक्षूक प्रवासास निघतो. झाशी, धार, ग्वाल्हेर, कानपूर, लखनौ काल्की, अयोध्या, काशी यांसारख्या दूरच्या ठिकाणी त्याला आलेले अनुभव मोठे विलक्षण आहेत. त्यातच १८५७ च्या बंडाची वावटळ उठून लेखक त्यात सापडला. त्यामुळे तर मुळच्या प्रवासवर्णनामध्ये अद्भूततेची भर पडली. मानवी स्वभावाचे विविध प्रकारचे नमुने आणि एकापाठोपाठ एक येणारे चित्तथरारक प्रसंग यांचे अतिशय मोकळे, प्रांजल असे वर्णन या वर्णनातून गोडसे भटजींनी साकार केले आहे. त्यांची व्युत्पन्नता व बहुश्रुतता, त्यांचा समजूतदारपणा व दैववादी परंतु जिज्ञासूवृत्ती, अनेक बिकट प्रसंगी त्यांच्या मनाने धारण केलेले असाधारण धैर्य यांचे मनोज्ञ चित्रण या वर्णनाच्या पानापानांतून विखुरलेले आहे त्या आपत्तीत त्यांनी उभे केलेले राजकिय, सामाजिक व धार्मिकस्थितीचे चित्रण अतिशय उद्बोधक आहे. झाशीच्या राणीचे लेखकाने रेखाटलेले शब्दचित्रण अतिशय परिणामकारक आहे.

झाशीच्या बिजनाचे चित्रण, कानपूरची लढाई, चित्रकूट पर्वतावरील अनुभव इ. प्रसंगचित्र लेखकाने आपल्यासमोर साक्षात उभी केली आहे. इंग्रजांची राजनीती आणि एत्तद्देशीयांची निर्णायकी अवस्था यांचेही मोठे परिणामकारक चित्रण या वर्णनातून साकारले आहे. लेखकावरचे भिक्षुकी संस्कार आणि त्यामुळे त्याच्या मनाच्या निरनिराळ्या प्रसंगीच्या विविध छटा अतिशय हृदय आहे. गोडसे गुरूजींनी आपल्या प्रवासातील जीवनानुभव येथे जीवंत केले आहेत. त्यांनी अर्थप्राप्तीसाठी केलेला प्रवास आणि त्या प्रवासाची फलश्रूती सांगितली आहे. कुटुंबास कर्ज फार झाल्यामुळे ते बाहेर पडतात. अनेक सुखदु:खे भोगून अखेरीस घरी परत येतात, त्यावेळी पैसे जवळ नाहीत अशीच परिस्थिती असते. तेव्हा माणसाच्या दैवात / प्रारब्धात जे असेल, तेच खरे अशी त्यांची दैववादीवृत्ती बनते. बंडाची प्रचंड भीषणता आणि त्यामागची कारणमीमांसा गोडशांच्या बुध्दीला न उलगणारी बाब होती या घटनेची भयावह सामान्य माणसाच्या अनुभवातून प्रत्ययाला येते. म्हणूनच या प्रवासवर्णनाला एक रंगत येते. गोडसे भटजींचे व्यक्तिमत्व बाळबोध घराण्यातील आहे. त्यांच्यावर आधुनिक संस्कार झालेले नाहीत. आपण कलावंत आहोत. आपण काही कलाकृती निर्माण करत आहोत याची जाणीवही त्यांना नाही. त्यामुळेच हे प्रवासवर्णन अजोड, अप्रतिम झाले आहे. त्यातील भाषाशैलीही त्यामुळेच सरळ साधी आणि अनघड अशी आहे.

या पुस्तकाकडे ऐतिहासिक दस्तावेज म्हणून पाहिले जाते. इतिहास जिथे असतो तिथे समाज असतो. कारण समाजातच तो घडत असतो. डॉ. मालशे यांच्यासारख्या विलक्षण समीक्षकाने याला 'मराठीतले चटका लावणारे प्रवासवृत्त' असे विशेषण दिले आहे. राजकारण, समाजकारण, धर्मकारण यांविषयी जागरूक असणाऱ्या व्यक्तीने ही हकिकत लिहिलेली नाही. परंतु यावर्णनात अनुभूतीचा आगळा कस आहे, प्रांजळपणा आहे. तत्कालीन घडणाऱ्या सर्व सामाजिक ऐतिहासिक घटनांचे सरळसाधे, मनोवेधक वर्णन आहे. निवेदनाची तऱ्हा संस्कृतच्या अंगाने जाणारी असली तरी विद्वजड नाही. मराठमोळी ठाकठिकीची आहे. यातील अनेक प्रसंगांना जो चित्तवेधकपणा लाभला आहे त्याचे प्रमुख कारण म्हणजे गोडसे भटजींच्या वृत्तीतील मनमोकळेपणा. १८५७ च्या बंडाकडे एका मोठ्या सामाजिक स्थित्यंतराकडे गोडसे भटजींचे पाहणे उत्कटेचा प्रत्यय देते. १८५७ सालच्या परिस्थितीचे जे चित्र गोडसे भटजींनी रेखाटले आहे ते अपूरे आहे हे उघडचे आहे. पण तरीदेखील या वृत्तकथनाने एक विशिष्ट गोष्ट साध्य केली आहे याबाबत गाडगीळ, मर्मज्ञदृष्टी दाखवणारी आहे ते म्हणतात, इतिहास हा माणसांच्या जीवनातून घडतो. माणसांच्या ईर्षा, श्रध्दा, त्यांची सुखदु:खे, त्यांची धडपड आणि जीवनक्रम यांच्याशी तो निगडीत असतो. मॅग्ना चार्टा ही नुसती सनद नाही. अनेक माणसांच्या ईर्षा आणि प्रयत्न यातून ती निर्माण झाली होती. माणसांची कत्तल होते तेव्हा कोणीतरी बाई विधवा होते, कोणते तरी पोर पोरकं होते, कोणीतरी माणूस जिवाच्या भयाने थरथरत असतो, करूणा भाकत असतो. परंतु इतिहास लिहिला जातो तेव्हा बहुधा हाडामाडासाच्या अनेकविध व्यक्तींशी त्यांचे हे जे नाते असते ते त्यातून वगळले जाते. त्यामुळे तो एक प्रकारे अपुरा असतो. शुष्क आणि निर्विकार असतो. इतिहासाचे हे अपुरेपण अंशत: तरी दूर करण्याचे बहुमोल कार्य या प्रवासवृत्ताने केले आहे. त्याचप्रमाणे तत्कालीन सामाजिक जीवनातले इतिहासाच्या नजरेतून सुटलेले अनेक तपशील या पुस्तकात आपल्याला आढळतात. इतिहासाच्या अंगाने लिहतांना त्या पुस्तकात सामाजिक, सांस्कृतिक बाबीही प्रकर्षाने मांडल्या आहेत त्यातल्या प्रत्येक प्रसंगात, घटनेत मानवी समान व मानवी मन गुंतलेले दिसते. १८५७ च्या बंडाची हकिकत अधिक गोडले भटजी असे चित्र या पुस्तकात आपणास बघायला मिळते. या पुस्तकात गोडसे भटजी सरळ आणि प्रांजळ निवेदन करताना अनेक गोष्टी येऊन

जातात. प्रवासात येणाऱ्या स्थळांचे, प्रदेशांचे वर्णन वाचतांना याची जाणीव होते. गोडसे भटजी स्वत:च्या गावापासून म्हणजे वरसई पासून उत्तर हिंदुस्थानात प्रवासाला निघतात त्यावेळी त्यांच्या मार्गामध्ये अनेक स्थळे आलेलली आहेत. त्या त्या स्थळांचे वेगळेपण व वैशिष्ट्य स्वाभाविकपणे व अचूकपणे आपल्याडोळ्यासमोर उभी करतात. तिथली माणसं, वृत्ती, सणवार, संस्कृती यांचे चित्रण करतात.

राणी लक्ष्मीबाई यांच्या दत्तक प्रकरणाचे वर्णन देखील एका वेगळ्याच समाजमान्यतेचे दर्शन घडवते. दत्तक प्रकरणाचे वर्णन करताना म्हटले आहे की, 'लक्षुंबाईने हा नियम ठेविला होता की भर्ता मरण पावल्यावर केशवपन आहले. नाही तर प्रतिदिवसी ती कृच्छे प्रायश्चित्त आहे. याजवरून स्नान होताच भस्म धारण करून आचमन करून तीन कृच्छांचा संकल्प करून ती ब्राम्हणास तीन रूपये प्रति दिवसी देण्याचा क्रम सुरू ठेविला होता. येथे कृच्छे याचा अर्थ प्रायश्चित्त तर आहे मग दोनवेळा कसले प्रायश्चित्त? तीन कृच्छांचा संकल्प करून तीन रूपये ब्राम्हणांस झाशीवाली देत असे. यावरून धार्मिक समजूती लक्षात येतात. काल्पीच्या प्रवासातले झाशीच्या राणीच्या संदर्भातले वर्णन लक्षात घेण्यासारखे आहे. काल्पीच्या मार्गावरून जात असताना काका–पुतणे एका विहिरीवर पाणी पिण्यास थांबतात. तेथे घोड्यावरून जाणारे ४–५ जण थांबतात त्यात पुरूष वेशातील झाशीवाली राणी असते. गोडसे भटजी तिला ओळखतात. तिला तहान लागलेली असते. हे लगेच रस्सी मडके घेऊन पाणी काढण्यास लागतात तेव्हा बाईसाहेब म्हणतात, तुम्ही विद्वान. "तुम्ही पाणी काढून मी पिणार नाही. मीच काढित्ये...पाणी पिऊन झाल्यावर ती बोलली मी अदशेर आट्याची धनीन आहे. मजला रांडेमुंडेस काही एक गरज नव्हती. परंतु सर्व हिंदूबद्दलचा धर्मसंमधे अभिमान धरून कर्मास प्रवृत्त जाहाले. परंतु ईश्वरे यश दिले नाही." राणीची प्रत्यक्ष भेट गोडसे भटजींनी अनुभवल्यामुळे राणीचे व्यक्तीचित्र ते अत्यंत बोलकेपणाने रेखाटतात.

प्रवासाला निघालेले विष्णुभटजी गोडसे १८५७ च्या स्वातंत्र्यसमरात सापडतात त्यामुळे तत्कालीन राजकीय अंगाचेही ज्ञान होते. इंग्रजी सत्तेने केलेल्या कारवाया, हिंदूंनी केलेली धडपड, पण इंग्रजांच्या धोरणी कारभारापुढे त्यांचे काहीच न चालणे वगैरे गोष्टी यात सातत्याने येतात. एकामागून एक इंग्रजांनी खालसा केलेली संस्थाने त्यासाठी वापरलेल्या युक्त्या...ज्या आपल्याला राज्यशास्त्रात आणि इतिहासात वाचून ठाऊक असतात, त्या अत्यंत खुबीने आणि पुस्तकाचा अविभाज्य भाग म्हणून येतात. त्यामुळे धार्मिक सामाजिक, सांस्कृतिक अंगाबरोबरच राजकीय अंगाचेही महत्व लक्षात येते आणि या पुस्तकाचा अभ्यास करताना तो किती बारकाईने, किती व्यापकतेने करावा लागतो हे ही लक्षात येते. तत्कालीन राजकीय परिस्थितीवरचे त्यांचे भाष्य काही वेळा नकळतही येत असेल पण ते येतेच. नैमिषारण्यावरून प्रवास करत असताना ते चौघेहीजण एका गावात थांबतात. त्यावेळी तेथे काही लोक येऊन जागत बसले. कारण विचारताच एका दारूड्या इंग्रजी ऑफिसरचा रस्सी लोटा या गावात हरवला होता, तर तो शोधण्यासाठी तिथल्या काही जणांची इंग्रजांनी हत्या केली हे वाचले असता अंगावा काटाच उभा राहतो. इंग्रजी राज्यात काठीला सोने लावून गेले तरी काही होत नाही. अशी प्रौढी मिरवण्याच्या आधी किती लोकांची हत्या झाली आहे हे पाहिले की परकीय राज्याची, त्यावेळच्या राजकारणांची कल्पना येते.

**समारोप–**

विष्णुभटजी गोडसे यांनी केलेल्या प्रवासाचा आराखडा पहाताना तो त्यांनी पायी केला, कधी बैलगाडीतून केला, तर काही वेळा घोड्यावरून कसा केला असेल याचे सामान्य माणसांना आश्चर्य वाटते.

ग्वाल्हेरच्या बायजाबाई शिंदे सर्वतोमुखयस मथुरेला करणार आहेत अशी बातमी मिळताच त्यासाठी तिकडे जाण्यासाठी सर्वतोपरी तयारी करणे आणि उत्तर हिंदुस्थानात प्रवासास जाणे हे ही पायी किंवा फारतर बैलगाडीने ही गोष्ट धाडसाचीच होती. ते वरसईवरून निघाले आणि मालेगावलाच त्यावेळची राजकीय धामधूम लक्षात आली. इंग्रज सरकारविरूध्द संस्थानिक, राजे राजवाडे, नवाब, इतर अधिकारी तसेच हिंदी सैनिक हयांचा असंतोष वाढत चालला होता आणि त्यांचे पर्यवसान १८५७ च्या बंडात झाले. हयाच बंडात गोडसे भटजी सापडले त्यामुळे ते ज्या यज्ञासाठी चालले होते, तो तर रहीतच झाला. पण त्यांला आपला प्रवास उलट–सुलट पध्दतीने करावा लागला.

संदर्भ :

१. माझा प्रवास – गोडसे भटजी
२. आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास – अ. ना. देशपांडे